




दैनिक **लोकआरंभ** लोकक्रांतीचा आरंभ

dainiklokaarambh@gmail.com

LOK AARAMBH

कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

संपादक:राहुल मारोतीराव वाईकर

बीड/महाराष्ट्र वर्ष २ रे | गुरुवार २४ ऑक्टोबर २०२४ | अंक ३१८ • पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु



प्रतिनिधी नेमणे आहे.

बीड आंबेजोगाई गेवराई वडवणी केज परळी पाटोदा शिरूर कासार धारूर आष्टी माजलगाव इच्छुकाने संपर्क साधावा

९४०३६ ४१४८२

राहुल मारोतीराव वाईकर


# आज सगळ्यांनी अंतरवलीत या, इच्छुक उमेदवारांना मनोज जरांगेंची महत्त्वाची सूचना

मी मुलाखती घेणार नाही. जे इच्छुक आहेत ते प्रचंड आहेत. न्याय द्यायचा असेल तर एक द्यावा लागणार आहे, हे समाजाला माहित आहे.अनेक जण इच्छूक आहेत म्हणून मीच त्यांना इकडे बोलून घेत आहे. 23 जिल्ह्याचे आपण बोलावलं होतं. मात्र रात्रीपासून फोन सुरु झाले आहेत. पण माझं असं म्हणणं आहे की एका टप्प्यात सगळं करू. राहिलेले जिल्हे हॅलो एक-दोन दिवसात घ्यायचे होते. मात्र उद्याच सगळे या... सकाळी 8 वाजल्यापासून आपण सुरु करू. रात्रीचे 12 वाजो की 4 वाजो सगळ्यांशी चर्चा करणार आहे. महाराष्ट्रातील सगळे इच्छुक या कार्यकर्त्यांना सोबत आणू नका, असं आवाहन मनोज जरांगे यांनी केलं आहे.



राज्यात होत असलेल्या विधानसभा मतदारसंघात मनोज जरांगे यांनी उमेदवार देण्याचं ठरवलं आहे. यासाठी इच्छुकांनी अर्ज भरा. ऐनवेळी आपण कुणी अर्ज मागे घ्यायचा ते ठरवू, असं मनोज जरांगेंनी याआधीच जाहीर केलंय. त्यानंतर आता इच्छुक उमेदवारांना मनोज जरांगेंनी महत्वाच्या सूचना दिल्या आहेत.

## इच्छुक उमेदवारांना मनोज जरांगेंच्या सूचना काय?

कुणीपण फॉर्म भरू नका. कारण बाकीचे लोक आपल्याला नाव ठेवतील. मी उद्या मतदारसंघ सांगणार नाही. आपण एक – एक उमेदवार तयार करत आहोत ज्या मतदारसंघात आपण लढवायचं ठरवलं आहे. त्याच मतदारसंघात लढवायचं बाकीच्यांनी फॉर्म काढून घ्यायचे. उद्या राहिलेले सगळे जिल्हे येऊन जा. दोन-चार गावाला सांगून ठेवले जेवणाची व्यवस्था करून ठेवा. पूर्ण तोडगा काढण्याचा उद्या प्रयत्न करणार आहे, असं जरांगे म्हणालेत.

## गनिमी कावा अन् साधनता; जरांगेंचा उमेदवारांना कानमंत्र

आम्ही फक्त उद्या एक उमेदवार देण्याची प्रक्रिया पूर्ण करतोय. त्यांच्या पूर्ण याद्या कळाल्याशिवाय मतदारसंघ आणि उमेदवार सांगणार नाही. त्यांचे कोण आहेत ते आम्हाला आधी बघायचे. कारण त्यांनी आमच्यावर डाव टाकला होता. त्यामुळे आम्हाला त्यांच्यावर डाव टाकावा लागणार आहे. त्यांचे उमेदवार कोण आहेत हे बघ ना आमच्यासाठी महत्त्वाचं आहे. त्यामुळे आपला उमेदवार आणि मतदारसंघ आताच कळू द्यायचा नाही सावधगिरी गनिमी काव्याने डाव ठरवायचा आहे, असंही जरांगे म्हणालेत.

## बिअर शॉपी च्या नावाखाली चालणाऱ्या दारुच्या अड्ड्यावर धाडी

आज बिअर शॉपी च्या नावाखाली त्याच्या बाजूला वेगळ्या ठिकाणी परमिट रूम सारखे रूम तयार केले असून त्या ठिकाणी राजरोसपणे दारू पिल्या जाते, यामुळे निवडणूक अनुषंगाने कायदा व सुव्यवस्था बाधा होत आहे, यामुळे अशा अवैध धंद्यावर धाडी टाकण्यासाठी पोलीस अधीक्षक श्री अविनाश बारगळ यांनी मोहीम हातात घेतलेली आहे.

याच अनुषंगाने बीड शहर पोलीस स्टेशनने बीड शहर हद्दीतील



वेगवेगळ्या बियर शॉपी वर ज्या बिअर शॉपी च्या बाजूला अवैधरित्या दारू विकली जाते आणि पिल्या जाते त्या ठिकाणी छापे मारले आहेत. दारू पिण्याचे साहित्य आणि त्याची आढळून आलेल्या लोकांना पोलिसांनी अटक केली आहे.

सदरील कारवाई ही पोलीस अधीक्षक श्री अविनाश बारगळ, अपर पोलीस अधीक्षक श्री सचिन पांडकर, उपविभागीय पोलीस अधिकारी श्री विश्वंभर गोलडे, यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री शितलकुमार बल्लाळ, पोलीस उपनिरीक्षक श्री उमेश निकम, सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री बाबा राठोड, पोलीस अंमलदार शहंशाह सय्यद, मनोज परजणे, अशपाक सय्यद, जयसिंग वायकर, तोंडे, सानप, तांबारे आदींनी केली आहे.

## अशोक हिंगे यांचा वंचित च्या मराठवाडा अध्यक्ष पदाचा राजीनामा

बीड (प्रतिनिधी ):- वंचित बहुजन आघाडीचे मराठवाडा अध्यक्ष अशोक हिंगे पाटील यांनी आज आपल्या पदाचा राजीनामा राष्ट्रीय अध्यक्ष आदरणीय बाळासाहेब आंबेडकर यांच्याकडे दिला आहे.

राजीनामा पत्रात ते म्हणतात पक्षात कार्यरत असताना जो मान सन्मान, संधी दिली त्याबद्दल मी राष्ट्रीय अध्यक्ष आदरणीय बाळासाहेब आंबेडकर, प्रदेशाध्यक्षा रेखाताई ठाकूर यांचे मनःपूर्वक आभार मानतो.तसेच आपण व मराठवाड्यातील सर्व जिल्हाध्यक्ष, पदाधिकारी कार्यकर्ते यांनी जे प्रेम व सहकार्य दिले त्यातुन मी उतराई होवु शकत नाही.

शेकडो मराठा तरुणांच्या आत्मबलीदानानंतर, मनोज जरांगे पाटलांच्या आंदोलनानंतर मराठवाड्यात कुणबी नोंदी शोधुन प्रमाणपत्र वाटप करण्यात येत आहेत. लोकसभेनंतर झालेल्या राज्य कार्यकारिणीच्या बैठकीत बैठकीत वितरीत करण्यात आलेली सर्व कुणबी प्रमाणपत्र बोगस आसुन ती रद्द करण्यात यावीत अशी असंविधानीक मागणी शासनाकडे करण्याचा राज्य कार्यकारिणीने निर्णय घेतल्याने मला सामाजिक दृष्ट्या पक्षात काम करणे अडचणीचे ठरत आसल्याने मी आज मराठवाडा अध्यक्ष पदाचा राजीनामा देत आहे.पक्षात कार्यरत असताना माझ्याकडुन कळत नकळत काही चुका झाल्या आसतील कुणाचे मन दुखावले आसेल तर त्यासाठी क्षमस्व..




## गुटख्याने भरलेला कंटेनर पकडला एक कोटीच्या मुद्देमाल जप्त बीड ग्रामीणच्या सपोनि बाळराजे दराडेंची कारवाई

दैनिक लोकआरंभ//

बीड प्रतिनिधी

बीड-अवैध धंद्यावर पोलीस अधिक्षक यांनी कठोर कारवाई करण्याच्या दिलेल्या सूचना असताना बीडच्या जुन्या आरटीओ कार्यालयाजवळ एक कंटेनर भरून गुटखा सपोनि बाळराजे दराडे यांनी पकडला आहे. राजनिवास गुटखा लातूरकडे जात असताना ही कारवाई करण्यात आली. यात 1 कोटींच्या पुढे माल असून कंटेनर आणि गुटखा ग्रामीण पोलिसांनी ताब्यात घेतला आहे.ग्रामीण पोलीस ठाण्यातील



सहाय्यक पोलीस निरीक्षक बाळराजे दराडे यांनी अवैध धंद्यावर केलेल्या कारवाया मोठ्या प्रमाणावर चर्चेत आहेत. बुधवारी रात्री 8 च्या सुमारास त्यांनी जुन्या आरटीओ कार्यालयाजवळ सापळा रचून गुटख्याने भरलेल्या पूर्ण कंटेनर ताब्यात घेतला आहे. यात राजनिवास गुटखा असून तो छत्रपती संभाजी नगरवरून लातूरकडे जात असल्याची प्राथमिक माहिती आहे. सपोनि बाळराजे दराडे यांनी केलेल्या या कारवाईमुळे गुटखा माफियांचे मात्र धाबे दणाणले आहेत.1 कोटींच्या पुढे सदर गुटखा असल्याची माहिती असून सध्या हा कंटेनर पोलीस मुख्यालयात आणण्यात आला आहे.

## डॉ.योगेश भैय्या क्षीरसागर साहेब यांच्या विधानसभा तिकिटासाठी श्री क्षेत्र कन्कलेश्वर महादेव मंदिरात साकड.

बीड प्रतिनिधी :- सध्या महाराष्ट्रात होऊ घातलेल्या विधानसभा निवडणुकी संदर्भात बीड विधानसभेच्या राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (अजितदादा पवार गट) बीड विधानसभेसाठी उच्चविभूषित, सर्वसामावेशक नेतृत्व, कामदार, शांत व संयमी अशा अष्टपैलू नेतृत्व असणारे डॉ. योगेश भैय्या क्षीरसागर यांच्या तिकिटावर शिक्केमोर्तब होण्यासाठी व महायुती मधील सर्व उमेदवार विजयी होण्यासाठी आज कन्कलेश्वर या ठिकाणी महादेव मंदिरा बहुजन रयत परिषद चे जिल्हाध्यक्ष मा. विनोद दादा हातागळे यांच्या संकल्पनेतून दुग्धाभिषेक करून



महादेवाच्या चरणी प्रार्थना केली. यावेळी दुग्धाभिषेक करताना स्वप्निल हातागळे, अमोल जाधव, प्रभाळे, लखन पिवळ, केके कांबळे, सुरेश गायकवाड, गुरुप्रसाद शहाणे, मारुती सोनवणे, गणेश हातागळे, किरण वाघमारे,अभिषेक जाधव, राजू चव्हाण, पवन उबाळे, राहुल दोघे, भग्रिया, गणेश सर आदी मित्रपरिवार उपस्थित होता

# गेवराई विधानसभा मतदारसंघांमध्ये प्रा.पी.टी. चव्हाण सक्षम उमेदवार आ. पंकजाताई मुंडेची शिफारस

**बीड प्रतिनिधी,**

सध्या स्वतंत्र विधानसभा निवडणुकीचे वारे वाहू लागले आहेत. प्रत्येक राजकीय पक्ष विविध सामाजिक सामान्य कार्यकर्त्यांना आपल्याकडे ओढण्याचा प्रयत्न करीत आहे. अनेक पक्षांमध्ये त्यांनी समर्पित व धडाडीचे नेते काम करीत आहेत. भाजपामध्ये प्रदेश स्तरावर तळमळीने काम करीत असलेल्या ओबीसीचे संघर्षशील नेते प्रा.पी.टी. चव्हाण यांना भारतीय जनता पार्टीने गेवराई विधानसभेत उमेदवारी देऊन समस्त ओबीसी समाजाला राजकीय न्याय घ्यावा. अशी मागणी भारताच्या राष्ट्रीय सचिव टाटा ओबीसीच्या संघर्ष कन्या आ. पंकजाताई साहेब मुंडे साहेब भाजपाचे वरिष्ठ नेत्याकडे केली जात आहे. भारतीय जनता पक्षाचे प्रदेश कार्यकारणी सदस्य, ओबीसी आरक्षण बचाव संघर्ष समितीचे प्रदेश समन्वयक सातारा राष्ट्रीय बंजारा परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रा.पी.टी चव्हाण हे दिवंगत लोकनेते गोपीनाथरावजी मुंडे यांचे तालमीत तयार झालेला कार्यकर्ता आहे. साहेबांच्या अकाली निधनानंतर आ. पंकजाताई साहेब मुंडे नेतृत्वाखाली अनेक वर्षापासून भारतात शास्त्रीय पद्धतीने काम करीत आहेत. गेवराई विधानसभा मतदारसंघांत बंजारा, ओबीसी, भटके विमुक्त व अठरापगड जातीमध्ये प्रा पी.टी. चव्हाण सर्वाधिक चर्चेतील चेहरा म्हणून ओळखले जातात. त्याचबरोबर बहुजन समाजाच्या संघर्षशील लोकनेते आदरणीय आ. पंकजाताई साहेब गोपीनाथरावजी मुंडे यांचे कट्टर समर्थक आहेत त्याचबरोबर भाजपाच्या वरिष्ठ नेत्या सोबत त्यांचे थेट संबंध आहेत. ओबीसी भटके विमुक्त, दलित, आदिवासी, अल्पसंख्याक समाजाचे न्याय हक्कासाठी रस्त्यावर उतरून मागील 35 वर्षांपासून प्रा. पी.टी चव्हाण संघर्ष करीत आहेत. भाजपा व ओबीसीचे समर्पित व निष्ठावंत कार्यकर्ता म्हणून प्रा.पी.टी. चव्हाण सर्व दूर परिचित आहेत. भारतीय जनता पार्टीचे विविध



कार्यक्रम, मेळावे, सभा, अधिवेशन, केटर कॅम्प मध्ये ते हिरारीने भाग घेत आले आहेत. तसेच अलीकडे संपन्न झालेल्या बीड लोकसभा मतदारसंघाच्या निवडणुकीत प्रा.पी.टी. चव्हाण यांनी दोन महिने रात्र दिवस प्रचंड मेहनत करून लोकसभेच्या भाजपाचे उमेदवार आदरणीय पंकजाताई साहेब मुंडे निवडून आणण्यासाठी गाववाडी वस्ती तांड्यावर दौरे करून समाजाचे मतदान भाजपकडे वळविण्यासाठी शर्थीचे प्रयत्न केले आहे. या कामे त्यांना पूर्ण यश आले नसून जिल्ह्यातील बंजारा व ओबीसी समाज बांधवांनी 90% पेक्षा जास्त मतदान भारताचे टाकण्याचे काम केले आहे दूर्देवाने आदरणीय पंकजाताई मुंडे यांच्या निष्ठाता पराभव झाला. असा अशा हरहुन्नरी कार्यकर्त्याला भारतीय जनता पार्टीने गेवराई विधानसभा मतदारसंघात अधिकृत उमेदवारी देऊन राज्यातील बंजारा समाज वगेरे विधानसभेतील ओबीसी समाज बांधवांना सामाजिक व राजकीय घ्यावा अशी जोरदार मागणी केली जात आहे भाजपाचे वरिष्ठ नेते उपमुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस साहेब, भाजपाचे राष्ट्रीय सचिव आ. पंकजाताई साहेब मुंडे व भाजपाचे प्रदेशाध्यक्ष आ. चंद्रशेखर बावनकुळे साहेब यांच्याकडे ओबीसी समाज बांधवांच्या वतीने करण्यात आली आहे. या मागणीचे सहानुभूतीपूर्वक दाखल घेऊन गौरी विधानसभेमध्ये ओबीसी समाज उमेदवारी द्यावी उमेदवारी दिल्यास राज्यसेवा मराठवाड्यातील बंजारा समाजामध्ये आनंदाचे वातावरण पसरले व 48 विधानसभा मतदारसंघात लाखोच्या संख्येने मतदान असलेल्या बंजारा बांधव भारतीय जनता पार्टीकडे मोठ्या प्रमाणात आकर्षित होतील, समाजाचे मतदान भाजप व मित्र पक्षाच्या उमेदवारांच्या पारट पडेल पर्यायाने भाजप व माहितीचे सरकार पुन्हा एकदा सत्तेवर येण्यासाठी मदत होईल अशी प्रत्येकी प्रतिक्रिया जाणकारांकडून व्यक्त करण्यात येत आहे.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
गुरुवार २४ ऑक्टोबर २०२४
https://lokaarambh.com


# सर्वांच्या जीवनात आकडेवारीचे विशेष महत्त्व!

दरवर्षी २० ऑक्टोबर रोजी जागतिक सांख्यिकी दिनाचे आयोजन जगभरात सांख्यिकीच्या मूलभूत तत्त्वांच्या उपलब्धींवर प्रकाश टाकण्यासाठी केले जाते. हा दिवस संयुक्त राष्ट्र सांख्यिकी आयोगाच्या मार्गदर्शनाखाली आयोजित केला जातो. दि.२० ऑक्टोबर २०१० रोजी प्रथमच जागतिक सांख्यिकी दिन साजरा करण्यात आला. तेव्हापासून हा दिवस दर पाच वर्षांनी साजरा केला जातो. श्री कृष्णकुमार आनंदी -गोविंदा निकोडे गुरूजी हा महत्वपूर्ण संकलित लेख प्रस्तुत करताहेत.... संपादक.

दि.२० ऑक्टोबर २०१० हा जागतिक सांख्यिकी दिन म्हणून साजरा करण्याचा प्रस्ताव संयुक्त राष्ट्रसंघ सांख्यिकी आयोगाने मांडला होता. त्यानंतर महासभेने हा प्रस्ताव स्वीकारला आणि अधिकृतपणे हा दिवस प्रथमच जागतिक सांख्यिकी दिन म्हणून स्वीकारला. यासोबतच दर पाच वर्षांनी हा दिवस साजरा करण्याचा निर्णयही घेण्यात आला.

जागतिक सांख्यिकी दिनाचे महत्त्व: हा दिवस साजरा करण्याचे महत्त्व हे आहे की आपल्या दैनंदिन दिनचर्येतील आकडे आपल्या गोष्टी केवळ सोप्याच नव्हे तर वेगवान देखील करतात. याशिवाय आकडेवारीच्या मदतीने आपल्या भूतकाळातील तसेच वर्तमानातील गोष्टी स्पष्ट होतात. आजच्या काळात आपल्या सर्वांच्या जीवनात आकडेवारीचे विशेष महत्त्व आहे. यासोबतच जागतिक सांख्यिकी दिन हा देशाच्या प्रत्येक घटकाच्या विकासात आणि प्रगतीमध्ये महत्त्वाची भूमिका बजावतो.

जागतिक सांख्यिकी दिन हा सांख्यिकी साजरे करण्याचा आंतरराष्ट्रीय दिवस आहे . युनायटेड नेशन्स स्टॅटिस्टिकल कमिशनने तयार केले. तो पहिल्यांदा २० ऑक्टोबर २०१० रोजी साजरा करण्यात आला. हा दिवस दर पाच वर्षांनी साजरा केला जातो.

सन २०१०पर्यंत १०३ देश राष्ट्रीय सांख्यिकी दिन साजरा करतात, ज्यात ५१ आफ्रिकन देशांचा समावेश आहे जे दरवर्षी १८ नोव्हेंबर रोजी संयुक्तपणे आफ्रिकन सांख्यिकी दिवस साजरा करतात.

भारतात यंदा १८वा सांख्यिकी दिन साजरा करण्यात आला आहे. सन २००७ पासून २९ जून हा दिवस राष्ट्रीय सांख्यिकी दिन म्हणून साजरा केला जातो आणि भारतातील सांख्यिकीशास्त्रज्ञांनी केलेल्या अपवादात्मक योगदानाची कदर केली जाते, विशेषत: प्रख्यात सांख्यिकीशास्त्रज्ञ दिवंगत प्रा. प्रशांत चंद्र महालनोबिस यांच्या जयंती निमित्त. या वर्षाची थीम आहे निर्णय घेण्यासाठी डेटाचा वापर जपून करा. दिल्लीत हा दिवस साजरा करण्यासाठी एक कार्यक्रम साजरा करण्यात आला, ज्यात १६व्या वित्त आयोगाचे अध्यक्ष डॉ.अरविंद पनगरिया उपस्थित होते. यावेळी बोलताना डॉ.पनागरिया म्हणाले, “डिजिटल आणि इतर माध्यमांद्वारे सर्वत्र उपलब्ध असलेल्या माहितीच्या प्रचंड मागणीला तोंड देण्यासाठी प्रामाणिक, मजबूत आणि अचूक आकडेवारी तयार करणे हे सध्याचे आव्हान आहे.” त्यांनी वकिली केली की सर्व तरुण सांख्यिकीशास्त्रज्ञांना सैद्धांतिक आणि उपयोजित सांख्यिकी पद्धतींमध्ये योगदान देऊन राष्ट्र आणि जगाचे नेतृत्व करण्यासाठी प्रोत्साहित केले पाहिजे, जी पीसी महालनोबिस यांच्या स्मृतीस योग्य श्रद्धांजली असेल. श्री. पनगरिया यांनी विश्वास व्यक्त केला की भारत वैद्यक, शैक्षणिक, व्यवसाय, माहिती तंत्रज्ञान आणि अर्थशास्त्रातील नावीन्यपूर्ण डेटा-आधारित सांख्यिकीय संशोधन आणि विकास क्रियाकलापांमध्ये प्रशंसनीय कार्यासह योगदान देईल. ते म्हणाले, की अचूक डेटाची उपलब्धता सुनिश्चित करणे ही काळाची गरज आहे. सांख्यिकी आणि कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालयाचे सचिव, सौरभ गर्ग म्हणाले, की, मंत्रालय नियमितपणे कोणत्या प्रकारची प्रणालीगत सुधारणा करता येईल यावर लक्ष देत आहे, ते जोडून ते जोडले की डेटाचे वेळेवर प्रकाशन केले जावे, आयटी साधनांचा वापर केला जावा आणि त्यावर स्विच करावे की नाही. पारंपारिक पेन आणि पेपर सर्वेक्षणापासून दूर जाऊन संगणक सहाय्यित मुलाखत प्रणाली आणली जावी.

सन २००७ पासून २९ जून हा दिवस राष्ट्रीय सांख्यिकी दिन म्हणून साजरा केला जातो आणि भारतातील सांख्यिकीशास्त्रज्ञांनी केलेल्या अपवादात्मक योगदानाची कदर केली जाते, विशेषत: प्रख्यात सांख्यिकीशास्त्रज्ञ कै.प्रा. प्रशांत चंद्र महालनोबिस यांच्या जयंतीनिमित्ताने सन्मानित केले जाते. भारत 2९ जून रोजी सांख्यिकी दिन साजरा करतो, सांख्यिकीशास्त्रज्ञ प्रशांत चंद्र महालनोबिस यांचा हा वाढदिवस होय. यूके मधील रॉयल स्टॅटिस्टिकल सोसायटीने त्याच दिवशी २०:१० वाजता दि.२० ऑक्टोबर २०१० रोजी आपली सांख्यिकीय साक्षरता मोहीम सुरू केली.

॥ सर्वांना विश्व सांख्यिकी दिन सप्ताह निमित्त हार्दिक हार्दिक शुभेच्छा जी ॥

- संकलन व शब्दांकन -
श्री कृष्णकुमार आनंदी -गोविंदा निकोडे गुरूजी.
श्रीगुरुदेव प्रार्थना मंदिराजवळ,
रामनगर वॉर्ड, गडचिरोली.
फक्त व्हॉट्सॲप- 9423714883.

# संभाजी ब्रिगेड अनब उद्धव ठाकरे शिवसेनेची युती तुटली; संभाजी ब्रिगेडचा स्वबळाचा नारा ५० उमेदवार उभे करणार असल्याचे जाहीर

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट

नांदेड : विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने राज्यात घडामोडींना वेग आला आहे. काही पक्ष एकत्रित लढण्याची तयारी करत आहे, तर काही ठिकाणी पक्ष युतीतून बाहेर पडत स्वबळावर निवडणुका लढवण्याचा प्रयत्न करत आहेत, अशातच एक मोठी बातमी समोर आली आहे. संभाजी ब्रिगेड आणि शिवसेना ठाकरे गट यांच्यातील युती तुटणार असल्याची माहिती आहे. संभाजी ब्रिगेड राज्यात ५० पेक्षा जास्त उमेदवार जाहीर करणार आहे. शिवसेना ठाकरे गटासोबत अडीच वर्षे असणारी युती संभाजी ब्रिगेड तुटणार आहे. त्यामुळे शिवसेना ठाकरे गटाच्या अडचणी वाढण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. संभाजी ब्रिगेडच्या जागांवरती उमेदवार दिला जात नाही. त्यामुळे संभाजी ब्रिगेड नाराज असून त्यांनी आता स्वबळावर लढण्याचा निर्णय घेतल्याच्या चर्चा आहेत. संभाजी ब्रिगेड शिवसेना ठाकरे गटासोबत असणारी अडीच वर्षांची युती तोडणार आहे. लवकरच संभाजी ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष मनोज आखरे आपली भूमिका जाहीर करणार असल्याची माहिती समोर आली आहे. संभाजी ब्रिगेडच्या या निर्णयामुळे शिवसेना ठाकरे गटाला निवडणुकीत मोठा धक्का बसण्याची शक्यता वर्तवली जात आहे. संभाजी ब्रिगेडच्या एका शिष्टमंडळाने काही दिवसांपुर्वी मराठा आरक्षणासाठी आंदोलनाचा लढा उभारणाऱ्या मनोज जरांगे पाटील यांची भेट घेतली होती. मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावरून संभाजी ब्रिगेड मनोज जरांगें यांच्यबरोबर जाणार असल्याचे ही कळते. अडीच वर्षाची युती तोडणार असल्याची घोषणा शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे गटासोबत असणारी गेले दोन ते अडीच वर्षाची युती तोडणार असल्याची घोषणा आज पुण्यात संभाजी ब्रिगेडकडून करण्यात आली आहे. संभाजी ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष मनोज आखरे यांच्याकडून ही घोषणा करण्यात आली असून विधानसभा निवडणुकीत संभाजी ब्रिगेडला योग्य मान मिळाला नसल्याचा आरोप मनोज आखरे आणि संभाजी ब्रिगेडच्या कार्यकर्त्यांकडून करण्यात आला आहे. विधानसभा निवडणुकीत आम्हाला पाच ते सहा जागा देणार असल्याचं या आधी उद्धव ठाकरे यांनी सांगितलं होतं. मात्र आम्हाला आता एकही जागा दिली जात नसल्याने आम्ही हा निर्णय घेतला असल्याचं यावेळी संभाजी ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष मनोज आखरे यांनी सांगितलं आहे. तर या विधानसभा निवडणुकीत संभाजी ब्रिगेड स्वतंत्रपणे 50 जागा लढणार असल्याची घोषणा मनोज आखरे यांनी पुण्यातून केली आहे. त्यांच्या या निर्णयाचा फटका शिवसेना ठाकरे गटाला बसण्याची शक्तता आहे.

# आपलं भविष्य चांगलं करायचं असेल तर सर्व मतदारांना मतदान करायला प्रवृत्त करा




नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट

नांदेड-किनवट : आपलं भविष्य चांगलं करायचं असेल तर आपण व परिवारातील सर्व मतदारांना मतदान करायला प्रवृत्त करा मतदान न केल्याने चुकीच्या व्यक्ती सत्तेत बसतात. तेव्हा जगातील सर्वात मोठी लोकशाही असलेल्या आपल्या राज्याच्या व देशाच्या सर्वोच्चपदी विराजमान होणाऱ्या व्यक्तीला देखील आपलं ऐकावं लागेल यासाठी प्रत्येकांनी मतदान करावे. असे प्रतिपादन गट शिक्षणाधिकारी तथा स्वीप कक्ष प्रमुख गंगाधर राठोड यांनी केले.

८३- किनवट मतदार संघात मतदानाची टक्केवारी वाढण्यासाठी सहायक जिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी कावली मेघना (भाप्रसे) यांच्या मार्गदर्शनाखाली येथील बळीराम पाटील महाविद्यालयात मतदार जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याच्या शुभारंभी प्रमुख मार्गदर्शक म्हणून ते बोलत होते. प्राचार्य डॉ.एस.के. बेंबरेकर अध्यक्षस्थानी होते. यावेळी संपादक साजीद बडगुजर , पत्रकार आशिष देशपांडे यांची प्रमुख उपस्थिती होती. स्वीप कक्षाचे शाहीर प्रो.डॉ. मार्तंड कुलकर्णी यांनी पोवाडा सादर केला. गट शिक्षणाधिकारी तथा स्वीप कक्ष प्रमुख गंगाधर राठोड यांनी सर्व प्राध्यापक, विद्यार्थी व शिक्षकेत्तर कर्मचारी यांना मतदान शपथ दिली.

# आष्टी येथे स्नेह मेळाव्याच्या रूपातून धनगर समाज एकवटणार

## मा.जिल्हा परिषद अध्यक्ष शिवाजी राऊत यांच्या अध्यक्षतेखाली पुढील दिश्या ठरणार

पाटोदा प्रतिनिधी :

गेल्या अनेक दिवसापासून विविध पक्षाकडून वेगवेगळे आश्वासन दिले गेली आहेत परंतु ते हवेत विरगळल्याने आता योग्य वेळ आहे योग्य निर्णय घेण्याची. विधानसभेच्या निवडणुकीत उमेदवाराची रस्सीखेच सर्वत्र चालू आहे. परंतु सर्वत्र उमेदवारी मध्ये धनगर समाजामध्ये नाराजी दिसून येत आहे. धनगर समाजाला मिळणारे स्थान, समाजाची होणारी फसवणूक, होणारा वापर, या सर्वांच आत्मपरीक्षण करण्यासाठी येत्या 28 तारखेला “मोरेश्वर मंगल कार्यालय, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर चौक आष्टी” येथे



भव्य स्नेह मेळाव्याचे आयोजन माजी जिल्हा परिषद अध्यक्ष मा.शिवाजी राऊत च्या अध्यक्षतेखाली होणार आहे.

विधानसभेच्या तोंडावर आष्टी पाटोदा शिरूर मतदार संघामध्ये धनगर समाजाची दिशा ठरवणारा हा मेळावा पार पडणार आहे. मतदारसंघांमध्ये अनेक कार्यकर्त्यां मध्ये आष्टी मतदार संघामधून शिवाजी काका राऊत यांनी निवडणूक लढवावी अशी इच्छा व्यक्त होत होती. प्रत्येक तालुक्यामध्ये समाजाची दिशा व दशा ठरवण्यासाठी राऊत यांनी बैठकीचे आयोजन केले होते या बैठकीमधून सर्वांच्या आग्रहाने निवडणूक लढवण्याचा निर्णय राऊत यांनी घेतला. गेली अनेक वर्ष धनगर समाजाने एक हाती सत्ता अनेक प्रस्थापितांच्या हाती दिली. परंतु त्याची परतफेड म्हणून सर्वांनी येणाऱ्या विधानसभेच्या निवडणुकीमध्ये ओबीसी समाजाचा नेते राऊत यांच्या पाठीशी उभा राहून त्याची परतफेड करावी. असे सर्व समाजाचे इच्छा आहे. त्याविषयी मतदारसंघातील सर्व धनगर समाजाचे विचार ,मते जाणून घेण्यासाठी येत्या 28 तारखेला आष्टी येथे भव्य मेळाव्याचे आयोजन करून या ठिकाणी पुढील निर्णय भूमिका घेतली जाणार आहे.

शिवाजी काका राऊत यांच्या पुढील भूमिकीकडे मतदार संघातील प्रस्थापित नेत्यांची लक्ष वेधले आहे. त्यांची निर्णायक भूमिका ठरणार असून दिग्गज नेत्यांच्या मनात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.


# बाबा सिद्दीकी हत्या प्रकरणाचं पुणे कनेक्शन? आणखी तिघांना अटक

बाबा सिद्दीकी हत्या प्रकरणात पुण्यातून आणखी तिघांना अटक करण्यात आली आहे. रुपेश मोहोळ, करण साळवे आणि शिवम कोहाड या तीन तरुणांना पोलिसांनी अटक केलीये. पुण्यातल्या उत्तम नगर आणि शिवणे परिसरातुन या तिघांना पोलिसांनी ताब्यात घेतलं. हत्येच्या कटात सहभागी असल्याचे निष्पन्न झाल्यानंतर ही अटक करण्यात आलीये. तीनही आरोपी १९ ते २२ या वयोगटातले आहेत. निर्मल नगर गोळीबार प्रकरणात मुंबई गुन्हे शाखेने पुण्यात ही कारवाई केली आहे.

शिवणेमधून रुपेश राजेंद्र मोहोळ, वय 22, उत्तम नगरमधून करण राहुल साळवे, 19 वर्ष आणि शिवम अरविंद कोहाड, वय 20 यांना अटक करण्यात आलीये. या प्रकरणात त्यांचा सहभाग असल्याचे निष्पन्न झाले असून, त्यांना अटक करण्यात आलीये.

बाबा सिद्दिकी यांच्या हत्या प्रकरणात आजच ११ व्या आरोपीला पोलिसांनी हरियाणामधून अटक केली होती. त्यानंतर आज पुन्हा आणखी तिघांना अटक करण्यात आली असून आता आरोपींची संख्या १४ झाली आहे. बाबा सिद्दिकी यांची १२ ऑक्टोबर रोजी त्यांचा मुलगा आणि आमदार झिशान सिद्दिकी यांच्या कार्यालयाबाहेर गोळ्या झाडून हत्या करण्यात आली होती. या हत्येनंतर दोघांना पोलिसांनी ताब्यात घेतलं होतं तर एक शूटर फरार झाला होता. पोलिसांची टीम वेगवेगळ्या राज्यात जावून धागेदोरे तपासत आहे. या हत्येची जबाबदारी जरी लॉरेन्स बिश्नोई गँगने घेतली असली तरी पोलीस वेगवेगळ्या अँगलने तपास करत आहेत.

बाबा सिद्दिकी हत्या प्रकरणानंतर सलमान खानच्या सुरक्षेत ही वाढ करण्यात आली होती. कारण लॉरेन्स बिश्नोई गँगकडून याआधी सलमान खानला बऱ्याचदा धमक्या आल्या आहेत. सलमान खानच्या सर्व कुटुंबाला पोलिसांनी सुरक्षा पुरवली आहे. बाबा सिद्दिकी यांची हत्या सलमान खान सोबतच्या जवळीकतेमुळे झाल्याचा दावा लॉरेन्स बिश्नोई गँगने केला होता.



# प्रस्थापितांची घराणेशाही संपुष्टात आणण्यासाठी विस्थापितांचा नेता नितीन नाईकनवरे उतरणार निवडणूक रिंगणात

## ना जातीसाठी, ना स्वत:साठी निवडणूक रिंगणात उतरणार फक्त जनतेसाठी

माजलगाव / प्रतिनिधी माजलगाव विधान सभेसह महाराष्ट्रामध्ये विधानसभा निवडणुकांचे बिगुल वाजले असून माजलगाव तालुक्याच्या राजकारणात व समाजकारणामध्ये गेली अनेक वर्षापासून काम करत असणारे व प्रचंड अनुभव असणारे प्रस्थापितांची घराणेशाही संपुष्टात आणण्यासाठी विस्थापितांचा नेता समजले जाणारे नितीन नाईकनवरे उतरणार निवडणूक रिंगणात.

एकेकाळी आ. प्रकाश सोळंके यांचे खंदे समर्थक समजले जाणारे किशनराव नाईकनवरे यांचे सुपुत्र नितीन नाईकनवरे आपल्या वडिलांच्या तालमीत बालवयामध्ये वडिलांच्या हाताला धरून राजकारणाचे धडे शिकत. व त्यांना राजकारणातील आपले पहिले गुरु मानत त्यांच्या प्रेरणेतून, आचरणातून तसेच संस्कारातून विद्यार्थी दशेमध्ये माजलगाव मतदार संघातील राजकारणात सक्रिय सहभाग नोंदवत अनेक सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक तसेच राजकीय कार्यक्रमांमध्ये सहभाग नोंदवला अनेक आंदोलनामध्ये त्यांनी आपली छाप सोडत विविध पदे भूषवली. पक्ष श्रेष्ठींनी दिलेल्या पदाचा योग्य वापर करत कसलेही प्रलोभन न बाळगता केवळ खुर्चीचे राजकारण न करता इमाने ईतबारेपणे जनतेची सेवा हीच खरी ईश्वर सेवा हेच ध्येय बाळगत सदैव जनतेच्या आडीअडचनी सोडवण्यास प्रथम प्राधान्य देत आपल्या कार्याच्या माध्यमातून स्वत:ची ओळख निर्माण करत प्रमाणिकपणे वागत जनतेच्या प्रत्येक प्रश्नाची सोडवणूक करण्याचा प्रयत्न करणारा, त्यांच्या व्यथा जाणारा, प्रत्येक जाती धर्मातील जनतेस सोबत घेऊन चालणारा, भेदभावास तिलांजली देणारा विस्थापितांचा नेता म्हणून अख्या तालुक्यामध्ये स्वत:च्या अस्तित्वाची ओळख निर्माण करणारा जनतेचा सेवक नितीन नाईकनवरे यांची माजलगाव मतदार संघामध्ये ओळख आहे. सामाजिक शैक्षणिक सांस्कृतिक कार्यक्रम असो अशा ठिकाणी जातीपातीचा विचार न करता कार्यक्रमास हजेरी लावत सामाजिक बांधिलकीच्या नात्याने सढळ हाताने मदत करत सर्व समाजातील युवकांशी तसेच वयस्कांशी आदराने बोलत त्यांच्या हृदयामध्ये आपले स्थान निर्माण करून केवळ विकास रुपी कामांना चालना देण्याचे काम नितीन नाईकनवरे यांनी केलेले आहे. याच शिदोरीच्या जोरावर व आरक्षण लढ्यामध्ये सदैव संघर्ष योद्धा मनोज दादा जरांगे पाटील यांच्या मताशी सहमत राहुन वेळोवेळी त्यांच्या कार्यक्रमांमध्ये हजेरी लावत इतर एससी, एसटी, ओबीसी यांच्याशी सलोख्याचे



संबंध ठेवत प्रत्येकाच्या सुखदु:खामध्ये सामील होऊन इतरांची मने दुखावणार नाहीत याची दक्षता बाळगत मतदार संघातील प्रत्येक घटकाची काळजी घेत प्रत्येक समाजातील व्यक्तीच्या हृदयामध्ये नितीन नाईकनवरे यांच्या बद्दल अस्ता व लोकप्रियता असल्याचे स्पष्ट चित्र दिसून येत आहे. कुठल्याही पक्षामध्ये काम करत असताना त्याने केलेल्या कार्याची तसे त्याच्या प्रती असलेल्या लोकप्रियतेची व भावनेची कदर व्हायला हवी, मात्र कुठलाही पक्ष असो तो एकनिष्ठ, कार्यशील, विस्थापित कार्यकर्त्यास न्याय देत नसून शिक्षण सम्राट, साखर सम्राट, राजकारणात घराणेशाही असणाऱ्या प्रस्थापितांनाच पुन्हा पुन्हा उमेदवारी देत संधी देतात. याचमुळे अनेक तरुण युवा नेतृत्व करणारे व समजले जाणारे बंड करतात. असेच निर्मळ, स्वच्छ प्रतिमा असणारे नितीन नाईकनवरे यांना हेरत त्यांच्या कार्याचा समाजाप्रती प्रेम असल्याचा अभ्यास करत संघर्ष योद्धा मनोज दादा जरांगे पाटील यांनी नितीन नाईकनवरे यांच्या रूपाने माजलगाव विधानसभा मतदारसंघांमध्ये उमेदवारीचे संकेत मिळत असून लवकरच त्यांचे संकेत आल्यास संघर्ष योद्धा मनोज दादा जरांगे पाटील यांच्या आदेशान्वये ते उमेदवार ठरतील. माजलगाव मतदार संघातील कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती पदी वर्णी लागल्यानंतर मा. कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती नितीन नाईकनवरे यांच्या रूपाने तरुण युवकास संधी मिळाली आणि या पदावर असताना त्यांनी त्या संधीचे सोने केले. त्यांच्या कार्यकालमध्ये शेतकऱ्यांना १ रुपयांमध्ये जेवणाची व्यवस्था करण्यात आली तालुक्यात पडलेल्या दुष्काळामुळे शेतकऱ्यांच्या जनावरासाठी मार्केट कमिटीच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या गुरांसाठी चारा छावणी चालवण्यात आली. याच दुष्काळामध्ये तालुक्यामध्ये पाण्याच्या टाक्याची वाटप करण्यात आले, पत्रकारांना सोबत घेत माजलगाव सिंदफणा नदीपात्र स्वच्छ करण्यात आले, मोंढ्याचे स्थलांतर करून ४० एकर जागे मध्ये सुसज्ज मार्केट उभे करण्यात आले, बंजारा समाजाची अस्मिता असणाऱ्या कै. वसंतराव नाईक साहेबांचा पुतळा मोंढयामध्ये उभा करण्यात आला, मार्केट कमिटीच्या माध्यमातून रुग्णवाहिकेची सेवा उपलब्ध करून देण्यात आली, माजलगाव शहरांमध्ये १५ वर्षांपूर्वी मार्केट कमिटी व व्यापाऱ्यांच्या पुढाकारातून सीसीटीव्ही बसवण्यात आले, मराठा समाजास आरक्षण मिळावे म्हणून प्रत्येक आंदोलनामध्ये सक्रिय सहभागी घेतला, याच प्रकरणांमध्ये ९ तास पोलीस चौकशीस सामोरे जावे लागले, त्याच प्रकरणात ३०० ते ४०० निरपराध मुले कारण नसताना अडकली जात होती

---

# सोयगावात रूट मार्च:विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सोयगाव पोलीस अलर्ट

छत्रपती संभाजीनगर(चैताली औटे) सोयगाव शहरासह हद्दीतील आमखेडा, गलवाडा आदी गावात बुधवरी दुपारी दोन वाजता सीमा सुरक्षादलाच्या जवानांसह सोयगाव पोलिसांनी रूट मार्च केला दरम्यान शहरात निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्थेच्या प्रश्न निर्माण होऊ नये यासाठी पोलिसांनी खबरदारी घेतली आहे त्यासाठी सोयगाव पोलीस अलर्ट झाले आहे. शहरातील जुना बाजार



चौक,सोनार गल्ली, छत्रपती शिवाजी महाराज चौक,बस स्थानक,रामजी नगर,आमराई,आमखेडा, गलवाडा,या परिसरात बुधवारी दुपारी दोन वाजता रूट मार्च हाती घेण्यात आला पोलीस निरीक्षक पंकज बारवाल यांच्या नेतृत्वाखाली सीमा सुरक्षा दलाच्या एका तुकडी सह सोयगाव पोलिसांनी हा रूट मार्च केला यावेळी शहरात शांतता पसरली होती दरम्यान आचारसंहितेच्या कालावधीत कोणताही गैरप्रकार होवू नये त्यासाठी सोयगाव पोलीस अलर्ट झाले आहे सोयगाव सह तालुक्यात निवडणुका शांततेत व्हाव्यात यासाठी हा रूट मार्च घेण्यात आला आहे.

# विधानसभा निवडणूक २०२४ मनुष्यबळाचे प्रथमस्तरीय सरमिसळीकरण पूर्ण

बीड, दि. 23 : - बीड जिल्ह्यातील विधानसभा मनुष्यबळाचे पहिले सरमिसळीकरण मंगळवारी (ता. 22) जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी अविनाश पाठक यांच्या उपस्थितीत पूर्ण झाले. या सरमिसळीकरणाप्रसंगी निवडणूक उपजिल्हाधिकारी महेंद्रकुमार कांबळे उपस्थित होते. विधानसभेची निवडणूक 20 नोव्हेंबरला होत आहे. या निवडणुकीसाठी नियुक्त कर्मचाऱ्यांचे सरमिसळीकरण पूर्ण झाले आहे. यामध्ये जिल्ह्यात तीन हजार एक मतदान केंद्राध्यक्ष, प्रथम मतदार अधिकारी तीन हजार चार आणि इतर मतदार अधिकारी सहा हजार ३५७ असे एकूण १२ हजार ३६२ अधिकारी कर्मचाऱ्यांचा समावेश होता. यातील गेवराई १९६२, माजलगाव २०४२, बीड २२८३, आष्टी २४९८, केज २०२९, परळी विधानसभा मतदार संघातील १५४८ अधिकारी, कर्मचारी आहेत.

*****

---



पाटोदा तालुक्यातील पिठ्ठी जल जीवन मिशन कार्यक्रम योजनेंतर्गत गावातील नळ पाणी पुरवठा योजना पूर्ण कामाची पाहणी करताना मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जीवणे साहेब व ग्रामीण पाणी पुरवठा मुख्य कार्यकारी अभियंता मुकुंदराज आंधळे सोबत पाटोदा तालुका उपअभियंता सुनील कुलकर्णी साहेब व वाप्कोस कंपनीतील अभियंता हुले साहेब , व त्याचे तालुका अभियंता जायभाये , व शिंदे साहेब व ग्रामस्थ पिठ्ठी

# चौसाळा महाविध्यालयात मतदार जागृती अभियान संपन्न.

चौसाळा – कला व विज्ञान महाविध्यालय चौसाळा येथे राज्यशास्त्र विभाग व राष्ट्रीय सेवा योजने तर्फे मतदार जागृती अभियानासाठी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी बोलताना प्राचार्य डॉ. विलास भिल्लारे यांनी मतदानाचे महत्व आणि ते लोकशाही जिवंत ठेवण्यासाठी किती महत्वाचे आहे यावर सविस्तर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व




प्रास्ताविक प्रा. डॉ. महादेव मुंडे यांनी केले. ते म्हणाले की, जगातील सर्वात मोठा लोकशाही देश म्हणून भारत ओळखला जातो आणि ही लोकशाही मतदारांनी जिवंत ठेवली आहे. या वेळी कार्यक्रमाधिकारी डॉ. अमर अलदे व डॉ. संजय कदम यांनी विद्यार्थ्यांना मतदार जागृतीची शपथ दिली. शेवटी प्रा. सुधीर माने यांनी आभार व्यक्त केले या कार्यक्रमासाठी बहुसंख्य विद्यार्थी व प्राध्यापक उपस्थित होते.

---

# एकनिष्ठ आणि इमान जपणारे जगदीश गुरखुदे यांना भाजपचे जिल्हाध्यक्ष पद देऊन निष्ठावंतांला न्याय देणे आवश्यक

## जिल्हाभरातील भाजपा कार्यकर्त्यांची एकमुखी मागणी लोकनेत्या आ.पंकजाताई मुंडेंनी पुढाकार घेवून संधी द्यावी

बीड दि.22 (प्रतिनिधी) मागील पंचवीस वर्षांपासून लोकनेते स्व. गोपीनाथराव मुंडे यांच्याशी एकनिष्ठ राहून बीड जिल्ह्यात भाजप पक्षाची विचारधारा शहरी भागासह ग्रामीण भागात पोहोचण्यासाठी प्रामाणिकतेने काम करत पक्षाशी इमान राखत बीड नगरपालिकेत भाजपाचे एकमेव नगरसेवक म्हणून जनतेतून सलग तीन टर्म निवडून येण्याचा मान मिळवणारे व्यक्तीमत्व तथा भाजपचे बीड शहराध्यक्ष जगदीश गुरखुदे यांना पक्षाच्या जिल्हाध्यक्षपदी संधी द्यावी. त्यांच्या नियुक्तीतून प्रामाणिकपणे कोणत्याही अटीविना काम करणाऱ्या प्रामाणिक आणि स्वाभिमानी कार्यकर्त्याला न्याय द्यावा अशी एकमुखी मागणी जिल्हाभरातील भाजप कार्यकर्त्यांतून होवू लागली आहे. लोकनेत्या आ.पंकजाताई मुंडे यांनीच आता आपल्या या निष्ठावंत कार्यकर्त्याला संधी मिळवून देण्यासाठी पुढाकार घेवून पक्षश्रेष्ठीकडे विनंती करावी अशी मागणीही होत आहे. बीड भाजप शहराध्यक्ष जगदीश गुरखुदे हे सलग तीन टर्म बीड नगरपालिकेत नगरसेवक म्हणून बीड निवडून येत आहेत. भारतीय जनता पक्षाचे जाळे शहरासह ग्रामीण भागात विस्तारण्यासाठी त्यांनी घेतलेले परिश्रम आणि त्यांच्या निस्वार्थी कार्याचे स्वतः लोकनेते कै.गोपीनाथराव मुंडे यांनी वारंवार कौतुक देखील केलेले आहे.जगदीश गुरखुदे यांनी भारतीय जनता पक्षासोबत काम करत असताना त्यांनी जनतेचे प्रश्न सोडवण्यासाठी वेळ दिला आहे, देत आहेत. सर्वसामान्य माणसांना पक्षाशी जोडणे, त्यांना सोबत घेणे आणि त्यांचे प्रश्न सोडवणे असे हातोटी असलेले जगदीश गुरखुदे हे सर्वसामान्यांच्या मदतीला जाऊन जाणारे व्यक्तिमत्त्व म्हणून ओळखले जातात. कधी कोणाशी दुरावा नाही नाही, जो आपल्याकडे येईल त्याला होईल तितकी मदत करणे आणि त्यांच्या सुख-दुःखात सहभागी होणे हे गुरखुदे परिवाराचे वैशिष्ट्य आहे. मागील 30 वर्षांपासून बीडच्या समाजकारणात जगदीश गुरखुदे व त्यांचे बंधू परशुराम गुरखुदे हे सर्वसामान्यांची कामे करण्यासाठी



अहोरात्र मेहनत घेत आहेत. परशुराम गुरखुदे यांनी 'द्वारकाधीश' मित्र मंडळाच्या माध्यमातून बीड शहर आणि परिसरातील पंचक्रोशीत तरुणांचे संघटन निर्माण केले आहे. कुठल्याही अडला-नडल्या नागरिकांची कामे कामे करण्यासाठी हे बंधू धावून जातात. पुन्हा भारतीय जनता पक्षाचे पदाधिकारी म्हणून काम करताना त्यांनी कधीही आपल्यामुळे कोणी नाराज होणार नाही याची पुरेपूर काळजी घेतलेली आहे. अशा सामाजिक कार्याचा अनुभव गाठीशी असलेले नगरसेवक जगदीश भाऊ गुरखुदे यांच्या रूपाने भारतीय जनता पक्षाची विचारधारा पुन्हा एकदा जिल्हाभरात सर्व दूर पोहोचवण्यासाठी त्यांना आता योग्यवेळी जिल्हाध्यक्ष पद देऊन न्याय द्यावा अशी मागणी सर्वसामान्य कार्यकर्त्यातून होत आहे. पक्षश्रेष्ठी आता गुरखुदे यांच्या बाबतीत काय निर्णय घेतात याकडे सर्वसामान्यांसह भाजप कार्यकर्त्यांचे लक्ष लागले आहे. शहराध्यक्षपदाची जबाबदारी समर्थपणे सांभाळली भारतीय जनता पक्षाचे एकनिष्ठ कार्यकर्ते असलेले जगदीश गुरखुदे यांना पक्षाकडून बीड शहराध्यक्ष म्हणून नवीन जबाबदारी दिली होती, ती जबाबदारीही जगदीश गुरखुदे यांनी समर्थपणे पेलली. सर्वांना सोबत घेऊन काम करण्याची त्यांची पद्धत अनेकांना आपलीशी करणारी आहे. म्हणूनच या सर्वमान्य नेतृत्वाला बीड जिल्ह्याचे नेतृत्व देण्याची मागणी कार्यकर्त्यांतून होत आहे.

### आमदार पंकजाताई मुंडे यांनी एकनिष्ठ कार्यकर्त्याला न्याय द्यावा

लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांच्यासोबत नगरसेवक जगदीश गुरखुदे यांनी अनेक वर्ष निष्ठावंत आणि निस्वार्थ कार्यकर्ता म्हणून काम केलेले आहे. त्यानंतर लोकनेत्या आ. पंकजाताई मुंडे यांच्यासाठी ही गुरखुदे परिवाराने बीडमध्ये सातत्याने काम करत भाजपाची विचारधारा जनतेपर्यंत पोहोचवली आहे. आता योग्यवेळी पंकजाताई मुंडे यांनी या सच्चा आणि प्रामाणिक कार्यकर्त्याला जिल्हाध्यक्षपदी संधी देऊन न्याय द्यावा अशी मागणी कार्यकर्त्यांतून होत आहे.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

गुरुवार २४ ऑक्टोबर २०२४ पान क्रं - ४ PAGE NO 4

या जागेसाठी जाहिरात घेणे आहे

# मिशन मराठवाडा : आता सुट्टी नाहीच; विधानसभेच्या नकाशावर नवीन चेहऱ्यांची मांदियाळी

## मराठवाडा ठरवणार राज्याच्या राजकारणाची दिशा

मराठवाडा हा तसा चळवळींचा केंद्रबिंदु, आंदोलनाची भूमी. येथील अनेक चळवळी, आंदोलनांनी देशाला मोठा विचार दिला आहे. मराठवाड्यातील संत चळवळीने देशभरात समता, बंधुता आणि एकतेची घुसळण केली. येथील संतांनी, पंडितांनी देशभरात मोठा विचार प्रसवला. औद्योगिकीकरणाची नवीन मुहूर्तमेढ रोवली. दुष्काळाशी दोन हात करून अनेकांचं आयुष्य जगवलंच नाही तर फुलवलं. नामांतराच्या चळवळीने नवीन विचार दिला. हा लढा देशात ऐतिहासिक ठरला. तर गेल्या दहा वर्षांपासून मराठा आरक्षणाचा मुद्दा सिंचनाचे काम मराठवाड्याने केले आहे. या ज्वलंत विषयावर मराठवाड्याने राज्यालाच नाही तर देशातील आरक्षण चळवळीला नवा मंत्र आणि तंत्र दिले. आरक्षणासाठी आजवर हिंसक आंदोलनं झाली. मराठा समाजाचे विराट मोर्चे निघाले. त्यात स्वयं शिस्त दिसली. अहिंसक मार्गाने लाखो लोक रस्त्यावर उतरण्याचे हे उदाहरण विरळ म्हणावं लागेल. आता मराठा फॅक्टरची चर्चा रंगली आहे. लोकसभेत मराठा फॅक्टरने (Maratha Factor) त्याची ताकद दाखवली. महायुतीला केवळ एकच जागा खिशात घालता आली. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा शिलेदार छत्रपती संभाजीनगरमधून निवडून आला. ओबीसी मतांची खेळी खेळण्याचा प्रयत्न भाजपच्या अंगलट आला. मराठा फोर्स त्यांच्यापासून दूर गेल्याचे चित्र आहे. आता विधानसभेत पुन्हा एकदा मराठा फॅक्टर भाजपला त्रासदायक ठरणार की ओबीसी समीकरणं तारून नेणार हे समोर येईल. पण मराठवाड्यात भाजपला फटका बसला तर राज्याच्या राजकारणाची दिशा बदलेल हे नक्की. त्यातच आता एकनाथ शिंदे यांना मराठवाड्यात त्यांचे गणित साधता येऊ शकते. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याविरोधात मनोज जरांगे पाटील यांनी वादग्रस्त विधानं केलेली नाहीत. उलट उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना त्यांनी टार्गेट केलेले दिसते.




महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीचा बिगुल वाजला आहे. पुढील नोव्हेंबरमध्ये नवीन सरकार अस्तित्वात आलेले असेल. मतदार राजा कुणाच्या ओंजळीत मताची बिदागी देतो हे समोर येईल. एकाच टप्प्यात मतदान होणार आहे. बदलेल्या राजकारणामुळे प्रत्येक विधानसभा मतदारसंघात धाकधूक वाढली आहे. काही मतदारसंघात धक्कादायक निकाल लागण्याची शक्यता आहे. मराठवाड्यातील 22 मतदारसंघात टफ फाईट दिसू शकते. नवीन चेहऱ्यांच्या मांदियाळीत दिग्गजांना फटका बसू शकतो. लोकसभेप्रमाणेच काही मतदारसंघात नवीन उमेदवार जायंट किलर ठरू शकतात. शिवसेना (आणि राष्ट्रवादी काँग्रेसमधील) फुटीनंतर या मतदारसंघात चुरशीची लढत होईल. ठाकरे गट आणि शरद पवार गटाने या मतदारसंघासाठी मोठी फिल्डिंग लावली आहे. तर आता सुट्टी नाहीच म्हणत मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी महायुती, विशेषतः भाजपला थेट इशारा दिला आहे. मराठवाडा राज्याच्या राजकारणाची दिशा पालटण्याची शक्यता आहे. 22 जागांवर धुमश्चक्री

राज्यातील राजकारणाला 2019 पासून कलाटणी मिळाली. उद्धव ठाकरे यांनी अखंड शिवसेना, काँग्रेस आणि राष्ट्रवादीसोबत सत्तेत आणली. भाजपसोबत विधानसभा एकत्रित लढवणाऱ्या शिवसेनेने मुख्यमंत्री पद न दिल्याचा आणि विश्वास घात केल्याचा आरोप भाजपवर केला होता. त्यानंतर दोनच वर्षात देवेंद्र फडणवीस यांनी महाविकास आघाडीला सुरूंग लावला. पहिल्यांदा एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात शिवसेनेला मोठे भगदाड पाडले. तर दुसऱ्या प्रयत्नात अजित पवार यांच्या नेतृत्वात राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये उभी फूट पाडली. महायुतीचे सरकारने अंतर्गत वादावर तोडगा साधत आतापर्यंत यशस्वी वाटचाल केली. आता या फुटीनंतर विधानसभेच्या रणांगणात मराठवाड्यातील 46 जागांमधील 22 जागांवर धुमश्चक्री पाहायला मिळणार आहे. गेल्या विधानसभा निवडणुकीत 2019 मध्ये शिवसेना 12 आणि भाजप 16 मतदारसंघात विजयी झाले होते. भाजपने गेल्या निवडणुकीत जागा वाटपात शिवसेनेवर कुरघोडी केली होती. मराठवाड्यातील 46 जागांपैकी तब्बल 26 जागांवर भाजप उमेदवार तर 20 जागांवर अखंड शिवसेना लढली होती. शिवसेना 12 जागांवर विजयी झाली होती. पक्ष फुटीनंतर 9 आमदारांनी शिंदे गटाची वाट धरली. अब्दुल सत्तार, संदीपान भुमरे, संजय शिरसाट, प्रदीप जैस्वाल, रमेश बोरनारे यांनी शिंदे गटाची पताका हाती घेतली तर हिंगोलीत संतोष बांगर, नांदेडमध्ये बालाजी कल्याणकर, धाराशीवमध्ये तानाजी सावंत, ज्ञानराज चौगुले यांचा यामध्ये समावेश आहे. तर उर्वरीत तीन जणच ठाकरे गटासोबत राहिले. आता गेल्या निवडणुकीतील आकडेवारीचा आधार घेतला तर काही मतदार संघात उद्धव ठाकरे गट जुने शिलेदार उतरवेल. तर इतर ठिकाणी नवीन उमेदवार देईल, हे स्पष्ट आहे.

2019 मध्ये काँग्रेस आणि राष्ट्रवादीला प्रत्येकी केवळ 8 जागांवर समाधान मानावे लागले होते. राष्ट्रवादीतील फुटीनंतर दोनच आमदार त्यांच्या बाजूने होते. राजेश टोपे आणि संदीप क्षीरसागर यांनी शरद पवार यांची साथ कायम ठेवली. तर प्रकाश सोळंके, बाळासाहेब आसबे, धनंजय मुंडे, राजू नवघरे, बाळासाहेब पाटील, संजय बनसोडे यांनी अजितदादांचा गट जवळ केला. त्यामुळे या मतदारसंघात राष्ट्रवादी शरद पवार गटाला नवीन चेहऱ्यांना उमेदवारी द्यावी लागणार आहे. इच्छुक गुडघ्याला बाशिंग लावून तयार आहेत. यापूर्वीचे निकाल काय सांगतात?

साधारणतः 20 वर्षांपूर्वीच्या विधानसभा निवडणुकीत, 2004 मध्ये मराठवाड्यात विधानसभेच्या 46 जागांपैकी 7 जागा काँग्रेसकडे होत्या. तर 10 जागांवर राष्ट्रवादीने विजय मिळवला होता. शिवसेनेने 14 जागांवर तर भाजपने 12 जागा राखल्या होत्या. पुढे 2009 मधील विधानसभा निवडणुकीत 46 जागांपैकी काँग्रेसने मोठी मुसंडी मारली आणि 18 जागा जिंकल्या. राष्ट्रवादीला 12 जागा राखता आल्या. शिवसेना 7 जागा तर भाजपला अवघ्या 2 जागांवर विजय मिळवता आला होता. 2014 मध्ये मोठी उलथापालथ झाली. मोदी लाटेचा परिणाम मराठवाड्यातही दिसून आला. काँग्रेस निम्म्यावर म्हणजे 9 जागेवर विजयी झाली तर राष्ट्रवादीने 8 जागा राखल्या. शिवसेना 11 तर भाजप सर्वाधिक 15 जागांवर विजयी झाली. 2019 मध्ये काँग्रेस आणि राष्ट्रवादीला फटका बसला. दोघांच्या प्रत्येकी 8 जागांवर उमेदवार विजयी झाले. तर शिवसेनेने मराठवाड्यातून 12 जागांवर तर भाजपने 16 जागांवर विजय नोंदवला.

## मराठवाड्यात मराठा फॅक्टर किती प्रभावी?

मराठवाड्यातील 46 मतदारसंघांपैकी 26 मतदारसंघात मराठा समाज उलटफेर करू शकतो. या भागात मराठा मतपेढी परिणामकारक आहे. तर इतर मतदारसंघात ओबीसी मतं महत्त्वाची आहे. पण या ठिकाणी मराठा, मुस्लीम आणि दलित मते एकत्र आल्यास भाजपची वाट बिकट आहे. सध्या मनोज जरांगे पाटील यांनी थेट भाजप आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर बेछूट आरोप केले आहेत. त्यांनी त्यांचा रोख स्पष्ट केला आहे. त्यातच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याविषयीचा सॉफ्ट कॉर्नर अनेकदा दिसून आला आहे. जरांगे यांच्यावर महाविकास आघाडीसोबत छुप्या युतीचा आरोप करत फडणवीस यांनी ओबीसी आणि भाजपचा डीएनए एकच असल्याचा दावा केला होता. गेल्या काही दिवसांपासून मराठा समाज भाजपवर नाराज असल्याचे चित्र आहे. मराठवाड्यातील मराठा आंदोलनाची धग राज्यभर पोहचली आहे. मराठवाड्यात त्याचे अधिक चटके महायुतीला बसण्याची भीती आहे. लोकसभेतील निकालाने भाजपाला थेट संदेश दिला आहे. भाजपाला या भागात अधिक मेहनत घ्यावी लागणार आहे. मनोज जरांगे (Manoj Jarange Patil) यांनी उमेदवार उभे करण्यास आणि काहींना पाठिंबा देण्याचे धोरण आखले आहे. या मतविभाजनाचा कुणाला फायदा होतो, हे निकालानंतर समोर येईल. पण धास्तावलेल्या अनेक नेत्यांनी जरांगे पाटील यांची अंतरवाली सराटी येथे रात्री भेटीचा सपाटा लावला आहे. त्यावरून बऱ्याच मतदारसंघात समीकरणं बदलण्याचे संकेत मिळत आहेत.

## दसरा मेळावा बांधणार कुणाचे तोरण?

दसऱ्याला मराठवाड्यात भगवानगडावर मोठा मेळावा भरतो. सालाबादप्रमाणे यंदा पण हा मेळावा झाला. पण यंदा या मेळाव्याला मराठा आरक्षण आणि ओबीसी आंदोलनाची किनार होती. सध्या या दोन्ही मुद्दावरून मोठं ध्रुवीकरण सुरु आहे. तर जवळच नारायण गडावर पहिल्यांदा मराठा समाजाच्या वतीने मनोज जरांगे पाटील यांचा दसरा मेळावा झाला. त्यात मराठा आरक्षणाचा हुंकार भरण्यात आला. तर भगवानगडावर ओबीसींच्या हिताची गोष्ट करण्यात आली. या दोन्ही मेळाव्याला लाखोंच्या संख्येने नागरिकांची उपस्थिती होती. विधानसभेच्या तोंडावर या मेळाव्यांनी वातावरण निर्मिती केली आहे. मराठवाड्यातील 46 मतदारसंघापैकी अनेक मतदारसंघात मेळाव्याचा परिणाम दिसेल. कुणाच्या भाळी विजयाचे तोरण हे मेळावे बांधतात हे समोर येईल.

## एकनाथ शिंदे यांना होणार फायदा?

भाजपने अनेकदा मराठा आंदोलनामागे महाविकास आघाडी विशेषतः शरद पवार हे असल्याचा आरोप केला आहे. हे आंदोलन महाविकास आघाडीने हायजॅक केल्याचा आरोप करण्यात आला. पण या आंदोलनाचा भाजपलाच अधिक फटका बसल्याचे दिसून येत आहे. मनोज जरांगे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याविरोधात थेट मोर्चा उघडलेला नाही. त्यांचा रोष देवेंद्र फडणवीस यांच्यावर असल्याचे अनेक भाषणातून दिसून येते. मराठा आंदोलनाला काऊंटर करण्यासाठी ओबीसी आंदोलन सुरू झाले. त्याला देवेंद्र फडणवीस यांचं पाठबळ असल्याचा आरोप मराठा आंदोलकांनी केला. ओबीसी आंदोलनातील काही नेत्यांना देवेंद्र फडणवीस यांनी रसद पुरवल्याचा थेट आरोप मनोज जरांगे पाटील यांनी केला आहे. ओबीसी आणि आमचा डीएनए एकच असल्याचे विधान देवेंद्र फडणवीस यांनी केले होते. निवडणुकीच्या तोंडावर त्यांनी ओबीसी मते आपल्याकडे वळवण्याचा प्रयत्न केलेला आहे. जरांगे यांनी एकनाथ शिंदे यांच्याविरोधात तीव्र भाषा वापरलेली नाही. अनेकदा शिंदे यांनी मराठा आंदोलनाच्या पूरक भूमिका घेतल्याचे दिसून येते. ते वाशी येथे थेट जरांगे पाटील यांना भेटायला गेले होते. सगे-सोयरेबाबत त्यांनी पूरक भूमिका घेतली. यामुळे लोकसभा निवडणुकीत संदीपान भुमरे विजयी झाले. मराठवाड्याच्या मैदानात त्यामुळे महाविकास आघाडीसोबतच शिंदे सेनेला पण मोठी संधी असल्याची चर्चा सुरू आहे. काही मतदारसंघात थोडाफार फरक दिसू शकतो. पण भाजपला मराठवाड्याच्या मैदानात मोठी कसरत करावी लागणार हे नक्की. अजितदादा गटाने मराठा आरक्षणाला इतर कुणाच्या आरक्षणाला धक्का न लावता पाठिंबा दिला आहे. पण छगन भुजबळ यांनी ओबीसीतून मराठा आरक्षण देण्याच्या मागणीला कडाडून विरोध केल्याचे दिसून आले. त्यांनी मराठवाड्यात येत त्यासाठी खास ओबीसी सभा घेतल्या. त्यांच्यावर मराठा समाज नाराज झाला आहे. या नाराजीचा फटका अजितदादांना लोकसभेत सहन करावा लागला. आता विधानसभेत भुजबळ यांच्या भूमिकेचे काय पडसाद उमटतात हे एका महिन्यात समोर येईल.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com